**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (ठाणे जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ७४/२०१९** | **दिनांक १३/०९/२०१९** | **कालावधी ५ दिवस**


**डॉ. प्रशांत बोडके,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२०४१३२५५

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१

**डॉ. शितल यादव,**
तांत्रिक अधिकारी
कृषिविदया विभाग
८३७९९०११६०


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०७/०९/२०१९ ते १३/०९/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १४/०९/२०१९ सकाळी ८:३० पासून १८/०९/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७/०९ | ०८/०९ | ०९/०९ | १०/०९ | ११/०९ | १२/०९ | १३/०९ | | १४/०९ | १५/०९ | १६/०९ | १७/०९ | १८/०९ |
| २१ | १५० | ३८.० | ३८.० | ९.० | ०.० | - | पाऊस (मिमी) | ६५ | २० | ११ | २६ | ४ |
| २७.५ | २८.१ | २८.२ | ३०.१ | ३०.१ | २९.२ | - | कमाल तापमान (अं.से) | २९ | ३० | ३१ | ३१ | ३० |
| २५.२ | २४.४ | २५.० | २५.२ | २४.५ | २४.८ | - | किमान तापमान (अं.से) | २५ | २५ | २५ | २५ | २८ |
| - | - | - | - | - | - | - | मेघाच्छादन (ऑक्टा) | ८ | ८ | ७ | ६ | ७ |
| - | - | २१ | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ९५ | ९३ | ९४ | ९४ | ८८ |
| - | १०० | १०० | १०० | १०० | ९९ | | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ८७ | ८० | ७६ | ८१ | ८१ |
| २ | ३ | ४ | ३ | २ | ४ | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १२ | ८ | ९ | ८ | ८ |
| द. | द. | प. | नै. | नै.द. | द. | - | वाऱ्याची दिशा | द. | द. | द. | द. | द. |

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला

**दिनांक १४ ते १७ सप्टेंबर,२०१९ पर्यंत मध्यम ते जास्त स्वरूपाच्या पाऊसाची शक्यता असून आकाश मेघाच्छादित राहील.**

**दिनांक १३ ते १९ सप्टेंबर,२०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **पोटरी ते फुलोरा अवस्था** | • भात पिक पोटरी ते फुलोरा अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ ते १० सें.मी.पर्यंत नियंत्रित करावी.<br>• हळवे भात पिक फुलोऱ्या अवस्थेत असल्याने नत्र खताची तिसरी मात्रा ४३ किलो युरिया प्रती हेक्टर या प्रमाणात पाऊसाचा अंदाज घेवून देण्यात यावी. |
| **आंबा** | **पालवी** | • वाढत्या तापमानामुळे आंब्याला पालवी फुटण्यासाठी पोषक वातावरण तयार होत असल्याने पालवीचे किडी आणि रोगांपासून पासून संरक्षण करण्यासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ टक्के प्रवाही ६ मि.ली. किंवा क्विनोलफॉस २५ टक्के प्रवाही २५ मि.ली. + बाविस्टीन २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **नारळ** | **-** | • पाच वर्षावरील नारळाच्या प्रति झाडास ७५० ग्रॅम युरिया व ६६७ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश असा खताचा दुसरा हप्ता पाऊसाची तीव्रता कमी असताना देण्यात यावा.<br>• नवीन लागवड केलेल्या रोपांवर अति पाऊसामुळे कोंब कुजव्या रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने १ टक्का बोर्डोमिश्रणाची फवारणी करावी. |
| **भाजीपाला पिके** | **फलधारणा** | • ढगाळ वातावरण व आर्द्रतेमुळे वेलवर्गीय भाजीपाला पिकांमध्ये केवडा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी रोगग्रस्त पाने काढून नष्ट करावीत व मॅन्कोझेब किंवा झायनेब २.५ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. |
| **फळबाग रोपवाटिका** | -- | • बुरशीजन्यरोगाच्या प्रतिबंधासाठी फळबाग रोपवाटिकेतील कलमांना ०.२% कार्बेन्डाझिम २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून प्रति रोपाच्या पिशवीत ५० मि. ली. बुरशीनाशकाचे द्रावण ओतावे. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन** | -- | • ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे पक्षाच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढील चार- सहा आठवड्यांपर्यंत ब्रॉयलर फिनिशर खाद्य द्यावे. |

• **टीप: फवारणी ३ ते ४ तासांची पाऊसाची उघडीप असताना करावी.**

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**